महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort. Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं/उसप-२०२६/पाच/ 1784 दिनांक : 05 OCT 2026

वाचावे : १) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/उसप २०२५- २६/पाच/ E-३४२९०५६, दिनांक ०८.०९.२०२६

२) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/उसप २०२५- २६/पाच/ E-३४२८२९६, दिनांक ०८.०९.२०२६

३) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र. कशिमं/उसप २०२६-२७/पाच/१६४४, दिनांक ०९.०९.२०२६

४) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र. कशिमं/उसप २०२६-२७/पाच/१७३८, दिनांक २३.०९.२०२६

परिपत्रक

उच्चकला द्वितीय सत्र (Second Semester) व तृतीय सत्र (Third Semester) परीक्षेच्या आयोजनाबाबत.

(शैक्षणिक वर्ष २०२६-२७)

कला शिक्षण मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये पूर्नप्रविष्ठ (Repeater) विद्यार्थ्यांकरिता द्वितीय सत्र परीक्षा (Semester II) तसेच नियमित (Reguler) विद्यार्थ्यांकरिता तृतीय सत्र (Semester III) परीक्षेचे आयोजन संदर्भिय क्र. १ व २ वरील परिपत्रकान्वये जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार मंडळाशी संलग्नित कला परिसंस्थांवर/परीक्षा केंद्रावर करण्यात येणार आहे.

०२. प्रस्तुत परीक्षेच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, परीक्षा आवेदनपत्रे व परीक्षा शुल्क विहित वेळेत ऑनलाईन सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेशपत्र (Hall Ticket) कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉगिनवर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. परीक्षा प्रवेशपत्रावरील विद्यार्थ्यांचे नाव, अभ्यासक्रम, विषय इत्यादी बाबी अचूक असल्याची खात्री करुन संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा प्रवेशपत्रांचे वाटप करावे.

०३. द्वितीय सत्र व तृतीय सत्र समाप्ती परीक्षेच्या (Semester End Examination-SEE) सर्व प्रात्यक्षिक व सैध्दांतिक विषयांच्या प्रश्नपत्रिका संबंधित विषयाच्या परीक्षेच्या एक दिवस अगोदर दुपारी १.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉगिनवर उपलब्ध करुन देण्यात येतील. लॉगिनवर प्राप्त झालेल्या प्रश्नपत्रिकांच्या विद्यार्थी संख्येनुसार प्रिंट आऊट काढून प्रश्नपत्रिकेच्या प्रती विषयनिहाय स्वतंत्र लिफाफ्यात मोहोरबंद करुन आपल्या अभिरक्षेत ठेवाव्यात. मोहोरबंद केलेल्या प्रश्नपत्रिकांची पाकिटे संबंधित विषयाची परीक्षा सुरु होण्यापूर्वी परीक्षा कक्षातील विद्यार्थ्यांच्या समक्ष ०२ परीक्षार्थींच्या स्वाक्षरीने उघडण्यात यावीत. तसेच, प्रश्नपत्रिकेच्या पकिटावर पाकिट उघडण्याची वेळ नमूद करुन प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना वाटप करण्यात याव्यात.

०४. पूनर्रप्रविष्ठ विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या द्वितीय सत्र (Semester II) परीक्षेचे साहित्य खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या याद्या कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉगिनवर यापूर्वीच उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच, नियमित विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात येणाऱ्या प्रथम सत्र (Semester I) व तृतीय सत्र (Semester III) परीक्षेकरिता लागणाऱ्या साहित्याच्या याद्या यथावकाश कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉगिनवर उपलब्ध करुन देण्यात येतील. त्यानुसार, पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

०५. परीक्षेच्या वेळापत्रकानुसार परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी परीक्षा केंद्रावर संयोजक (Conductor), पर्यवेक्षक (Supervisor), लिपिक (Clerk), शिपाई/हमाल (Peon/Hamal), सफाईगार (Sweeper) इ. आवश्यक कर्मचारी वर्ग कला परिसंस्था स्तरावर नियुक्त करुन आदेशाची प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी. परीक्षेदरम्यान परीक्षा केंद्रावर कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घेऊन परीक्षा पारदर्शक व सुरळीतपणे पार पाडण्याची सर्वस्वी जबाबदारी परीक्षा केंद्रप्रमुख म्हणून संबंधित परिसंस्थेचे कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांची राहील. संयोजक (Conductor) व पर्यवेक्षक (Supervisor) यांनी परीक्षेदरम्यान भरावयाचे नमूने उच्चकला परीक्षेच्या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सदर नमूने अचूक भरून केंद्रप्रमुखांच्या सही-शिक्क्यानिशी मुल्यमापन केंद्रावर उत्तरपत्रिकांसोबत सादर करावयाचे आहेत.

०६. सैध्दांतिक विषयांच्या परीक्षेकरिता लागणाऱ्या मुळ उत्तरपत्रिका विभागीय वितरण केंद्रावरुन घेऊन जाण्याबाबत सर्व संलग्न कला परिसंस्थांना मंडळाच्या दिनांक २१.०९.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर तसेच उच्चकला परीक्षेच्या लिंकवर उपलब्ध आहे. ज्या कला परिसंस्थांनी वितरण केद्रावरुन अद्याप उत्तरपत्रिका प्राप्त करुन घेतल्या नसतील त्यांनी उत्तरपत्रिका तात्काळ घेऊन जाव्यात. तसेच, सैध्दांतिक विषयांकरिता केवळ मंडळाच्या उत्तरपत्रिकांचाच उपयोग करावा. जुन्या उत्तरपत्रिका वापरु नये.

०७. परीक्षा केंद्रपमुख यांनी परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती/अनुपस्थिती उच्चकला सत्र परीक्षेच्या https://hae.semesterpattern.msbae.in या लिंकवर आपल्या लॉगिनद्वारे न चूकता सादर करावी. त्याचप्रमाणे, मुळ उपस्थितीपत्रकाचा नमुना उच्चकला परीक्षेच्या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर उपस्थितीपत्रकावर विद्यार्थ्यांची स्वाक्षरीसह दैनंदिन उपस्थिती/अनुपस्थिती नमूद करुन मुळ उपस्थितीपत्रक उत्तरपत्रिकांसोबत मुल्यमापन केंद्रावर जमा करावे.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई

प्रति,

१) कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
४) प्राचार्य, शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था. (मंडळाशी संलग्नित)

प्रत,

१) मा. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर
४) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
५) निवड नस्ती.